# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५७६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–१७/०९/२०१६

**१) पाठीवर बासाच्या काठीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिली. :–**

दिनांक १५/०९/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या मुला सोबत गोष्टी करीत असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन तुम्ही आमच्या गोष्टी का करता या कारणा वरुन भांडण करुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे पाठीवर थापड बुक्यांनी मारुन व आरोपी क्र. २ ने उजवे पायाचे मांडीवर, मोडीवर पाठीवर बासाच्या काठीने मारुन जखमी केले व शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम३२४,५०४,५०६,३४ भादवीअवये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) रात्रीचे वेळी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०९/२०१६ रोजी ०१.१५ वा. दर. यातील आरोपी हा रात्री अंधारात आपले अस्तीत्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या हेतुने मिळुन आल्याने त्यास विचारले असता उडवाउडवीचे उत्तर दिल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १२२ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) महाराष्ट्र पोलीस कायदा लागु असतांना लोखंडी तलवार हातात मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १६/०९/२०१६ रोजी २०.४५ वा. दर. यातील आरोपीने आपल्या हातात अवैद्यरीत्या लोखंडी मुठेची तलवार ३४ इंच लांबीची सार्वजनीक ठिकाणी घेवुन फिरतांना मिळुन आल्याने व जिल्हात कलम ३७(१)(३) महाराष्ट्र पोलीस कायदा लागु असल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४,२५ भा.ह. कायदा १९४९ सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीवास पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**४) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक. १६/०९/२०१६ रोजी १२.०० वा. ते १३.३० दर. यातील मृतक मदन फकरु बागडे वय ५१ वर्ष, रा. सावरी यांच्या डोळयाला दिसत नसल्याने व पाठीला दुखापत असल्याने व घरी आंधळी आई असतांना या सर्व त्रासाला कंटाळुन घराच्या लाकडी आळयाला नायलॉन दोरीने गळफास लावुन आत्महत्या केली असे फिर्यादी ओमप्रकाश फकरु बागडे वय ४१ वर्ष, रा. सावरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेंभुर्णीकर पो.स्टे. लाखनी हे करित आहेत.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १६/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व ईतर वाहनांवरती ९३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.